## नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक २७/२०१२ मधील निशाण ५५ खालील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६, नियम १७ अन्वये वादपत्रामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथनांचा सारांश पुढीलप्रमाणेः-

प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ हजर झाल्यानंतर आणि जमिन विकू नये यासाठीचा तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज प्रलंबित असताना, त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ याचे दिनांक ०१/०५/२०१३ रोजी निधन झालेले असुनही त्याबाबत कोर्टात न कळविता प्रतिवादी क्र. १ चा मुलगा अबुबकर याने प्रतिवादी क्र. १ चा मुखत्यार म्हणून दावा मिळकत क. गट क्र. २८५/१ ह्या जमिनीचे दिनांक २५/०६/२०१३ रोजी श्री. देवीदास माधव देवकर या असामीचे नावे खरेदीखत करून दिले व त्या खरेदीखताचे आधारे सदर दावा मिळकतीला सदर श्री. देवकर यांचे नाव नोंद झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ चा मुलगा अबुबकर याने दावा मिळकतीत नवीन बांधकाम सुरू केल्याचे माहे जून २०१४ मध्ये वादीच्या निदर्शनास आले. त्यामुळे सदर श्री. देवीदास माधव देवकर यांना प्रतिवादी क्र. १३ म्हणून या दाव्याचे कामी सामील करून घेण्यासाठी, सदर खरेदीखताबाबतची वस्तुस्थिती व दावा मिळकतीत झालेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबतची वस्तुस्थती याबाबत वादपत्रात मजकूर समाविष्ट करण्यासाठी व सदर खरेदीखत व नवीन बांधकामाबाबत विनंती कलमात दाद मागण्यासाठी वादपत्रात दुरुस्ती करणे क्रमप्राप्त झाले आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी क्र. १ (१) अबुबकर यांनी निशाणी ६१ येथे म्हणणे देऊन अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी क्र. १ (१) च्या कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ मयत झाले आहेत याची माहिती असुनही वादीने त्याचे वारस मुदतीत अभिलेखावर आणलेले नाहीत. त्यामुळे दावा निरर्थक झाला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. १ चा मुलगा व वारस यांचेविरुद्ध वादीला कोणतीही दाद मागता येणार नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. नियोजित प्रतिवादी क्र. १३ यांनी निशाणी १११ येथे म्हणणे देऊन अर्जास विरोध केला. नियोजित प्रतिवादी क्र. १३ च्या कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

वादीला क. गट क्र. २८२ व २८५/१ या मिळकतींबाबत दावा दाखल

करण्याचा व दाद मागण्याचा हक्क केव्हाही नव्हता व नाही. नियोजित प्रतिवादी क्र. १३ हे प्रामाणिक खरेदीदार असून त्यांचे नावे झालेला खरेदीखताचा दस्त योग्य व कायदेशीर आहे. त्यामुळे अर्जात मागितलेली दाद बेकायदेशीर असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. उभय पक्षाचे सुविद्य वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

६. अर्जातील व म्हणण्यातील परस्परविरोधी कथनांच्या अनुषंगाने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील वादप्रश्न माझे विचारार्थ उपस्थित होतात. ते वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे -

| अ.क्र. | वादप्रश्न | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे विनंतीनुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यास वादी पात्र आहेत काय? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>वादप्रश्न क्रमांक १ बाबत</u> -

७. सदर दावा निरंतर ताकिदीसाठी, कब्जासाठी, जाहीर ठराव होऊन मिळण्यासाठी व वैकल्पकरित्या वाटपासाठी दाखल झाला आहे. वादीने मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणले असून त्यात मयत प्रतिवादी क्र.१ चा मुलगा अबुबकर यांचे नाव नमूद आहे. प्रस्तुत दावा दिनांक ११/०६/२०१२ रोजी दाखल झाला आहे. प्रस्तुत अर्जात नमूद खरेदीखत दिनांक २५/०६/२०१३ रोजी झालेले आहे व दावा मिळकतीत नवीन बांधकाम सुरू असल्याचे वादीला दिनांक २७/०६/२०१४ रोजी दिसून आल्याचे अर्जात कथन आहे. यावरून दुरुस्तीचा विषय असलेल्या घटना ह्या दावा दाखल झाल्यानंतर घडल्या असल्याचे प्रथमदर्शी निष्पन्न होते. दुरुस्ती अर्जाच्या चौकशीच्या वेळी दुरुस्ती मजकुराच्या गुणदोषांबाबत निर्णय करता येत नाही हे कायद्याचे स्थापित तत्व आहे.

८. प्रतिवादी व नियोजित प्रतिवादी यांना दुरुस्त वादपत्राबाबत कैफियत देण्याची व त्याबाबत पुरावा देण्याची संधी असल्याने सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे

नुकसान होणारे नाही. दाव्याचे कामी निरंतर ताकीद, कब्जा, जाहीर ठराव व वैकल्पिकरित्या वाटपाची दाद मागितली असल्याने मूळ वादप्रश्न सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान एकाचवेळी गुणदोषावर निर्णित होण्यासाठी, दाव्यातील अंतिम न्यायनिर्णयाबाबत भविष्यातील गुंतागुंत टाळण्याच्या दृष्टीने व नवीन प्रकरण निर्माण होण्याची शक्यता टाळण्याच्या दृष्टीने वादीने प्रस्तुत अर्जात केलेल्या विनंतीप्रमाणे दावा दुरुस्ती करण्यासाठी वादीला परवानगी देणे न्यायोचित ठरणारे आहे. सबब, मी वादप्रश्न क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

९. वर नमूद केलेल्या विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे सबब, वादप्रश्न क्र. २ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. वादीचा निशाणी ५५ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणे वादपत्रात पुढील तारखेस अगर तत्पूर्वी दुरुस्ती करावी, दुरुस्त दावा प्रत दाखल करावी व त्याची प्रत प्रतिवादींना पुरवावी.

**दिनांक - २६/०३/२०२१.** **(जी. एम. साधले)**
**ठिकाण - लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,लांजा,**
**जि.रत्नागिरी.**

*Case No : RCS No.27 of 2012*
*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision : 26/03/2021.*
*Order signed by P.O.on : 26/03/2021.*
*Order uploaded on : 26/03/2021.*

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Girish Madhukar Sadhale
Date: 2021.03.26 17:38:53 +0530